साकेतांक क्र 199409192२ NO1994091922

वाचा :- १] मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख [म. राज्य]पुणे यांचेकडील अधिसूचना क्रमांक एस. व्ही. सी. आर. ४३१८/स-४/९४, पुणे, दिनांक ३. ९. १९९४.
२] महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाकडील अधिसूचना क्र. कॉन-१०६७/१६७१३४[बी]-५, दिनांक ५. ९. १९६८.
३] महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील अधिसूचना क्र. कॉन-१५६९/२७४०७१[बी]-५, दिनांक २८. ९. १९७०.
४] महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील अधिसूचना क्र. कॉन-१०६५/१३२९४७-५, दिनांक २९ जुलै १९६६.

---०००---

क्रमांक एस. व्ही. सी. आर. ४३१८/स-४/१९९४,
पुणे, दिनांक :- १९ -९-१९९४.

## पुरवणी अधिसूचना

महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, निर्णय क्रमांक आस्थापना- १०९३/प्र. क्र. १९/ल-१, मंत्रालय, मुंबई, दिनांक १८ ऑगस्ट १९९४ अन्वये, भूमि अभिलेख खात्याची तालुका पातळीवर पुनर्रचना करणेबाबत शासनाने निर्णय घेतला आहे. व त्या अनुषंगाने या कार्यालयाकडील अधिसूचना क्र. एस. व्ही. सी. आर. ४३१८/स-४/१९९४, पुणे दिनांक ३. ९. १९९४ अन्वये, या विभागातील जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख या संवर्गातील काही पदांचे रुपांतर " तालुका निरीक्षक भूमि अभिलेख" असे करणेत आले असून सदर पदे तालुका पातळीवर "तालुका निरीक्षक भूमि अभिलेख" म्हणून, दिनांक १. १०. १९९४ पासून कार्यरत होणार आहेत. या शासन निर्णयाअन्वये, " तालुका निरीक्षक भूमि अभिलेख" यांना महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४ अन्वये, " भूमापन अधिकारी " म्हणून ही घोषित करणेत आले आहे. या अनुषंगाने तसेच सदर कायद्यातील कलम २[३१]नुसार त्यांनी "महसूल अधिकारी" म्हणून महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे प्रकरण १० नुसार अधिकार अभिलेखाची कामे करणेची आहेत.

वर नमूद केलेल्या दिनांक १८. ८. १९९४ चे शासन निर्णयाव्दारे अधिक्षक भूमि अभिलेख हे संबंधित जिल्हयाचे पद सिध्द " एकत्रीकरण अधिकारी" म्हणून राहाणार आहेत. शासन महसूल व वन विभागाकडील अधिसूचना क्र. कॉन-१०६५/१३२९४७/५, दिनांक २९जुलै १९६६चे अनुषंगाने " तालुका निरीक्षक भूमि अभिलेख" यांनी मुंबईचा जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्याचे एकत्रीकरण करणेबाबतचा कायदा सन १९४७" मधील तरतुदीनुसार जमिन एकत्रीकरण योजनेकामी व त्या संबंधीत इतर कामकाज करणेचे आहे.

सही/-[ नन्द लाल ],
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख [म. राज्य ]पुणे.

४२५६

--//२//--

प्रत/- अप्पर मुख्य सचिव [महसूल] , महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, यांचेकडेस माहितीसाठी सस्नेह अग्रेषित.

प्रतिलिपी/- अवर सचिव [ल-१] महसूल व वन विभाग/कार्यासन अधिकारी [ई-६], महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीस्तव अग्रेषित.

प्रतिलिपी/- व्यवस्थापक शासकिय मुद्रणालय, येरवडा, कारागृह मुद्रणालय, पुणे/मुंबई व व्यवस्थापक, शासकिय मुद्रणालय, नागपूर यांचेकडे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.

२/- सदरची अधिसूचना महाराष्ट्र शासनाचे राजपत्रांत प्रसिध्द करणेत यावी.

प्रतिलिपी/- सर्व जिल्हाधिकारी यांना माहितीसाठी सस्नेह अग्रेषित.
प्रतिलिपी/- सर्व विभागीय आयुक्त, यांना माहितीसाठी सस्नेह अग्रेषित.
प्रतिलिपी/- सर्व उपसंचालक भूमि अभिलेख यांना माहितीसाठी सस्नेह अग्रेषित.
प्रतिलिपी/- सर्व अधिक्षक भूमि अभिलेख , यांना माहितीसाठी सस्नेह अग्रेषित.

प्रतिलिपी/- सहाय्यक जमाबंदी आयुक्त [ सर्वसाधारण/ भूमापन/एकत्रीकरण ] यांना माहितीसाठी सस्नेह अग्रेषित.

प्रतिलिपी/- सर्व कार्यालय प्रमुख यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रतिलिपी/- कार्यासन अधिकारी ल-१, ल-२, ल-३, स-२, स-३, स-४, क-२, क-३, क-४, क-५, क-६ जमाबंदी आयुक्त कार्यालय, यांना माहितीसाठी अग्रेषित.

" नि र्ग मि त "

सहाय्यक जमाबंदी आयुक्त
[भूमापन]पुणे.

मु. टिबे/ १९. ९.

९-२५७